# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)



०५ फेब्रुवारी, २०१९


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०४/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **रामनगर, बल्लारशाह, वरोरा, भद्रावती, शेंगाव, मुल, पोंभुर्णा, चिमुर, भिसी, तळोधी, राजुरा, धाबा, गडचांदुर, जिवती, पाथरी** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१७** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०१ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **३७,१००/—रू.** चा मुददे्माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १)पोलीस स्टेशन गोंडपिंपरी :—

दिनांक **०४/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **गोंडपिंपरी** अंतर्गत पंचशिल चौक येथे ०६ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गोंडपिंपरी** येथे अप. क्र. **१६/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०६ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,६९०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गोंडपिंपरी** पोलीस करीत आहे.

---

### १)पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर :—

दिनांक **०४/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर** अंतर्गत लालपेठ कॉलरी येथे ०१ आरोपी ईसम हा सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **चंद्रपुर शहर** येथे अप. क्र. **१५५/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **६७०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **चंद्रपुर शहर** पोलीस करीत आहे.

---